04/05 Nikam

Page No.
Date

# कर्मवीर गणपत दादा मोरे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड

नाव :- तांबेकर अश्विनी सोमनाथ

विषय :- नांदुर मध्यमेश्वर परिसंस्थेच्या पर्यावरणीय अभ्यास

विषय शिक्षक :- निकम मॅडम

वर्ग :- SYBA

# अनुक्रमणिका


| अ.क्र | नाव | |
|---|---|---|
| 1] | प्रस्तावना | |
| 2] | पार्श्वभूमी | |
| 3] | नांदुर मध्यमेश्वर अभयारण्यातील वनसंपदा | |
| 4] | पक्षी जीवन | |
| 5] | प्राणी जीवन | |
| 6] | पक्षीगणना | |
| 7] | पक्षी निरीक्षणासाठी सोयी सुविधा<br>1] कालावधी<br>2] अंतर | |
| 8] | निष्कर्ष | |
| 9] | उद्दिष्टे | |

# प्रास्ताविक

नांदुर मध्यमेश्वर अभयारण्य महाराष्ट्र राज्याच्या नाशिक जिल्ह्यामधील निफाड तालुक्यात स्थित आहे. हा नांदुर मध्यमेश्वर जलाशयाचा परिसर आहे. येथे स्थानिक आणि स्थलांतरित पक्षी हजारोंच्या संख्येने आढळत असल्यामुळे ते महाराष्ट्राचे भरतपुर म्हणून ओळखले जाते. या अभयारण्याचे क्षेत्र सुमारे १००.१२ चौ. कि. मी एवढे आहे.

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यामधील खानगाव थडी येथे गोदावरी आणि कादवा नदीच्या संगमावर इ. स १९११ च्या सुमारास दगडी संगमावर इ. स १९११ च्या सुमारास दगडी बंधारा बांधण्यात आला. त्यामुळे निर्माण झालेल्या जलाशयाच्या परिसरात, इ. स. १९८६ मध्ये अभयारण्यास दर्जा देण्यात आला. १००.१२ चौ. कि मी क्षेत्रात पसरलेल्या या अभयारण्यास जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांनी महाराष्ट्र राज्याचे भरतपूर म्हणून गौरवले आहे. नांदुरमध्यमेश्वर येथील पक्ष्यांच्या अधिवासामुळे तसेच दुर्मिळ पक्ष्यांच्या अस्तित्वामुळे हे क्षेत्र महत्त्वपूर्ण पक्षीक्षेत्र (IBA) म्हणून घोषित करण्यात आले आहे. नांदुरमध्यमेश्वर अभयारण्यात विरळ सदाहरित जंगल आणि माळरान परिसर आढळून येतो. ४०० हुन अधिक विविध प्रकारच्या वनस्पती प्रजाती येथे बघायला मिळतात. वेगवेगळ्या पाण-वनस्पती, आपआपसातील हिरवीगार शेते, नदी किनाऱ्यावरची वनराई ह्या बाबी देशी- विदेशी पक्ष्यांना आकर्षित करत असतात.

नांदुरमध्यमेश्वर अभयारण्य परिसरात उदमांजर, कोल्हे, लांडगे, बिबळे, मुंगूस, विविध प्रजातीचे साप, कासव, हे वन्यप्राणी आढळतात. हिवाळ्यात रोहित, चक्रवाक, तलवार बदक, लालसरी,

चतुरंग, सुरय, कादव, लोटीवाला, उचकोचे, भगाटी, तुतारी, क्रौंच, गल, चिलखे, कुरल, हरीण, इत्यादी पाणपक्षी ओर देश असतात. यासारखा चटक, बगळे, चांदवा, काळपक्षी, पाणकोंबडी, सुगरणकाक, ढोकरा, शराटी, पाणबुडी हे स्थानिक पक्षी बघायला मिळतात.


नांदुरमधमेश्वर अभयारण्य, वन्यजीव विभाग, नाशिक

# पार्श्वभूमी :-

१९९९ साली गोदावरी आणि कादवा नद्यांच्या संगमावर बंधारा बांधण्यात आला. त्यातील पाणी पुढे दोन्ही बाजूंच्या कालव्याद्वारे सोडण्यात येऊ लागले. त्यामुळे गाळ, दलदल, गाळ साठून नदीपात्रात उथळ अशी भूरूपे तयार झाली. पक्ष्यांना खाद्य म्हणून आवश्यक असलेले मासे, शैवाल, दलदलीतील कीटक येथे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्यामुळे येथे पक्ष्यांची संख्या वाढत गेली. पक्ष्यांच्या स्थलांतराच्या काळात येथे सुमारे ३५००० पक्षी आढळत असल्याची नोंद आहे. १९८२ मध्ये ज्येष्ठ पक्षी तज्ञ डॉ. सालीम अली यांनी नांदुर मध्यमेश्वरला भेट दिली आणि हे तर महाराष्ट्राचे भरतपूर आहे असे उद्गार काढले आणि सरकारला हा परिसर अभयारण्य म्हणून घोषित करण्याची विनंती केली. पुढे १९८६ मध्ये हा परिसर नांदुर मध्यमेश्वर अभयारण्य म्हणून अधिसूचित करण्यात आला.

मो

येथे मोठ्या प्रमाणावर जैव विविधता आढळत असल्यामुळे आणि येथे आढळणाऱ्या पक्ष्यांच्या प्रजातींची संख्या आणि स्थलांतराच्या काळात एकुण पक्ष्यांची संख्या हजारोंच्या घरात असल्यामुळे जागतिकदृष्ट्या हे महत्वाचे स्थळ आहे. 2020 मध्ये या ठिकाणाला जागतिक रामसर स्थळ म्हणून मान्यता प्राप्त होणारे हे महाराष्ट्रातील पहिले ठिकाण आहे. या स्थळाचे रामसर यादीत समाविष्ट होणारे हे महाराष्ट्रातील पहिले ठिकाण आहे.


BIRDS OF NANDUR MADHYAMESHWAR

# नांदुर मध्यमेश्वर अभयारण्यातील वनसंपदा

नांदुर मध्यमेश्वर अभयारण्यात विरळ सदाहरित जंगल आणि माळरानाचा परिसर आढळतो. या अभयारण्यात 400 पेक्षा अधिक प्रकारांच्या वनस्पतींच्या प्रजाती आढळतात. या नांदुर मध्यमेश्वर अभयारण्य पुरेसी वनसंपदा आढळल्याने येथे वन्य-जीवन आणि विविध प्रकारचे पक्षी येथे आढळतात.

या अभयारण्यात 69 प्रकारांचे वृक्ष 27 प्रकारच्या वेली आणि 31 प्रकारांच्या गवत प्रजाती आढळतात. 15 क्षुद्रुप प्रजाती आणि 73 प्रकारांच्या छोट्या मोठ्या वनस्पतींनी संपन्न असलेल्या या अभयारण्यात सागा व्यतिरिक्त अर्जुन, पळस, ऐन, लिंबर, धावडा, तेंदु, मोह, चारोळी, आवळा, बेहडा, अंजन यासारखी मोठी झाडं आपण पाहु शकतो. तिखाडी, कुसळी, पवन्या, कुंदा सारखी गवत प्रजाती या अभयारण्यात मोठ्या प्रमाणात आहेत. 400 हुन अधिक विविध प्रकारांच्या वनस्पती प्रजाती येथे बघायला मिळतात. वेगवेगळ्या पाणवनस्पती, आसपासची हिरवीगार शेते, नदी, किनाऱ्यावरती वनराई, ह्या बाबी देशी - विदेशी पक्ष्यांना आकर्षित करत असतात.

Date

# पक्षी जीवन

नांदुर मध्यमेश्वर या अभयारण्यात विविध प्रकारचे पक्षी बघायला मिळतात. त्यामध्ये खंड्या, गाय, बगळे, पाण-कावळा, मुग्धबलाक, चित्रबलाक, जांभळी, पाणबुडी, राखी बगळा, हळदद कुंकू बदक असे पक्षी आढळतात. नांदुर मध्यमेश्वरच्या जलाशयाच्या परिसरात जांभळी कोंबडी मोठ्या प्रमाणात आढळते. त्यामुळे या कोंबडीला नांदुर मध्यमेश्वराची राणी असे म्हणतात. तसेच येथे रोहित, तलवार, बदक, लालसरी, चतुरंग, सूरय, कादंब, तुतारी, क्रौंच, करकोच कुरल, कादंब, खंड्या कमळपक्षी, पाणकोंबडी असे विविध प्रकारचे पक्षी आपल्याला या नांदुर मध्यमेश्वरच्या अभयारण्यात आढळतात.

मोकळ्या आकाशात भरारी घेणारा बहिरी ससाणा ध्यानस्थ साधूसारखा पाण्यात उभा असलेला बगळा एरव्ही चटकन न दिसणारा नर्तक, धनेश, करकोच असे विविध पक्षी मध्यमेश्वर पक्षी अभयारण्यात मनसोक्त बागडत असतात. माणसांच्या गर्दीपासून आणि सिमेंट-कॉंक्रिटच्या जंगलापासून लांब या अभयारण्यामध्ये नेहमी भरते पक्ष्यांची शाळा आणि ही अनोखी शाळा पाहायची असेल तर एकदा तरी महाराष्ट्राचं भरतपूर असं ज्या अभयारण्याला संबोधलं जातं या मध्यमेश्वर पक्षी अभयारण्याला भेट दयायला हवी पक्षी निरीक्षणासाठी येथे निरीक्षण मनोरे स्पोटिंग स्कोप अशा सुविधा उपलब्ध आहेत. येथे पक्षी निरीक्षणासाठी च्याउल बोट अभयारण्य व्यवस्थापनेकडुन उपलब्ध करुन दिली जाते. परंतु जलाशयातील पाण्याची पातळी, पक्षी जलाशयात विहार करत असल्यास ही बोट उपलब्ध नसते. तसेच ही बोट आपल्याच चालवावी लागते. अभयारण्य व्यवस्थापनेकडुन कोणताही बोट चालक उपलब्ध करुन दिला जात नाही.




# प्राणी जीवन

नांदुर मध्यमेश्वर अभयारण्यात आपल्याला विविध वन्य जीवन बघायला मिळेल त्यामध्ये कोल्हे, लांडगे, बिबटे, मुंगूस, उदमांजर चौशिंगा, नीलगाय, हरीण, इत्यादी वन्य प्राणी नांदुर मध्यमेश्वर या अभयारण्यात आढळतात. तसेच सरपटणारे प्राण्यांमध्ये विविध प्रकाराचे साप, धामण, अजगर, येथे बघायला मिळतात.

नीलगाय :-

नांदुर मध्यमेश्वर या अभयारण्यात आढळणारा एक प्राणी म्हणजे नीलगाय आहे. नीलगाय हा प्राणी साधारणता घोड्या प्रमाणेच दिसतो. पुर्ण वाढ झालेली नीलगाय हे जमिनीपासून साधारणता ५ फुटापर्यंत उंच असते. तर मादी नीलगाय ही ३ ते ३.५ फुट येवढी असते. नीलगायचा रंग हा राखाडी असतो. त्याच्या पायाच्या भागावर पांढऱ्या रंगाचा पट्टा दिसतो. नर आणि मादी या दोघांच्या मानेवर काळ्या रंगाची केस आयाळ दिसते.

हिवाळ्यात रोहित, चक्रवाक, तलवार, ब नीलगाय हा प्राणी शक्तिवान, चपळ, आणि वेगवान आहे. या नीलगाय प्राण्याची श्रवणशक्ती ही खुप चांगली नसते असे म्हणतात. नीलगाय हा प्राणी नेहमी कळपाने राहतो. एक कळपात साधारणता १० ते १५ नीलगाय असतात. नीलगायीचा गर्भधारणेचा काळ हा सर्वसाधारणता ८ ते ९ महिने असतो. मादी नीलगायी एकाच वेळेस दोन पिलांना जन्म देते. आणि त्यांचे संगोपन ही करते.



# पक्षीगणना :-

येथे दरवर्षी पक्षीमित्र संघटना आणि बी. एन. एच. एस. यांच्या वतीने जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात पक्षी-गणना केली जाते. पक्षी निरीक्षकांच्या नोंदीनुसार येथे सुमारे 240 पेक्षा आधिक प्रजातींचे पक्षी आढळतात.

महाराष्ट्रातील एक उत्तम पक्षीतीर्थ आहे. पक्षी निरीक्षणातून येथे 240 हुन आधिक प्रकाराचे पक्षी असल्याचे आढळून आले आहे. येथील जलाशयात 24 प्रकाराचे मासे आहेत. परिसरात 400 हुन आधिक प्रजातींच्या वनस्पतींची विविधता आहेत.

यापुर्वी झालेल्या पक्षी गणनेची नोंदी :-

| वर्ष | प्रजाती | एकुण संख्या |
|---|---|---|
| २००७ | ६३ | ३८६९९ |
| २००८ | ५५ | २५७०५ |
| २००९ | ४१ | १३१८८ |
| २०१० | ४९ | ३३०३७ |
| २०११ | ५१ | १४५५१ |
| २०१२ | ५६ | २२६५२ |
| २०१३ | ५९ | ४१८१९ |
| २०१४ | ४५ | १३७४९ |



Page No.
Date

# पक्षी निरीक्षणासाठीच्या सोयी सुविधा :-

पक्षी निरीक्षकांसाठी चापडगाव येथे दुर्बिण स्पॉटिंग स्कोप, फिल्ड गाईड (पक्षी मार्गदर्शक पुस्तक) मार्गदर्शक यांची सोय करण्यात आलेली आहे. जलाशयाच्या काठाने निरीक्षण मनोरे उभारण्यात आलेले आहेत.

मांजरगाव येथे सुद्धा निरीक्षण मनोरे उभारण्यात आलेला आहे. खाणगाव थडी येथे, निसर्ग निर्वाचन केंद्र, वन उद्यान, वनविश्रामगृह इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

## पक्षी निरीक्षणाच्या कालावधी :-

पक्षी निरीक्षणासाठी डिसेंबर ते फेब्रुवारी हा उत्तम कालावधी असतो. तसेच नाशिक हे तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळ असल्याने अभयारण्या सोबतच इतर ठिकाणी देखील फेरफटका मारता येतो.

## अंतर :-

नाशिक - नांदुर मध्यमेश्वर अभयारण्याचे अंतर 40 किमीचे आहे. नाशिक चांदोरी फाटा - सायखेडा शिंगवे मार्फत चापडगाव निरीक्षण गॅलरी येथे जाता येते. निफाड नांदुर मध्यमेश्वर अभयारण्याचे अंतर केवळ 12 किमी आहे. सिन्नर - नांदुर मध्यमेश्वर अभयारण्याचे अंतर 25 किमी आहे. सिन्नर - बारगाव पिंपरी, मांजरगाव मार्ग चापडगाव निरीक्षण गॅलरी आणि खाणगावथडी निसर्ग केंद्राला भेट देता येते.

# निष्कर्ष :-

नांदुर मध्यमेश्वर पक्षी अभयारण्य पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात आहे. आणि त्याला महाराष्ट्राचे भरतपूर असेही म्हटले जाते. नांदुर मध्यमेश्वर आर्द्र भूमीला रामसर आर्द्रभूमी म्हणून घोषित केले आहे. नांदुर मध्यमेश्वर ही महाराष्ट्रातील पहिली आर्द्र भूमी आहे.

नांदुर मध्यमेश्वर अभयारण्य महाराष्ट्र राज्याच्या नाशिक जिल्ह्यामधील निफाड तालुक्यात स्थित आहे. हा नांदुर मध्यमेश्वर जलाशयाचा परिसर आहे. येथे स्थानिक आणि स्थलांतरित पक्षी हजारोंच्या संख्येने येथे आढळतात. या अभयारण्याचे क्षेत्र सुमारे १००.१२ चौ कि.मी एवढे आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून आम्ही, नांदुर मध्यमेश्वर या पक्षी अभयारण्याच्या परिसंस्था आम्हाला जवळून अभ्यासता आले.

# उद्दिष्ट

पर्यावरण शास्त्र या विषयात प्रकल्प तयार करण्यासाठी नांदुरमध्येश्वर प्रकल्प तयार केला. या प्रकल्पातून असे उद्दिष्ट लक्षात येते की, सर्व प्राणी पशुपक्षी विविध व ते आपल्याला बघायला मिळतात त्यातून आपल्याला नवनवीन गोष्टी अभ्यासला मिळतात. हे उद्दिष्ट आपल्या लक्षात येते.